■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २७१ ■ गुरूवार दि.१९ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 271 ■ Thursday Dt.19 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# बीड जिल्ह्यातील परळी गुन्ह्यांसह पुन:श्च एकदा लाखो रुपयांच्या अपहारात गाजली..!

## ग्राहकांच्या वीज बिलात अपहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# परळी वैजनाथमध्ये खासगी ग्राहकांची विजबिलांची रक्कम नगरपरिषदेच्या नावावर; लाखोंचा अपहार?

## ब्रह्मदेव चाटेने परळी नगरपरिषदेच्या कारभाराचा बुरखा टरटर फाडला; घोटाळेबाज कर्मचाऱ्यांची कुंडली उघडली?

## परळी शहरात वीजबिल घोटाळ्यात दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई होईल का? महावितरण विभागाच्या कारवाईकडे लक्ष लागले?

बीड । प्रतिनिधी

परळी वैजनाथमध्ये एक नवाच प्रकार समोर आलाय. खासगी ग्राहकांच्या नावे असलेल्या वीज बिलाची रक्कम नगर परिषदेच्या नावावर टाकण्यात आली आणि ती वसूल देखील करण्यात आलीय. यामध्ये महावितरण व नगरपालिकेचे काही कर्मचारी संगनमत करत लाखो रुपयांचा अपहार करत असल्याची तक्रार ब्रह्मदेव चाटे या सामाजिक कार्यकर्त्याकडून करण्यात आली आहे. यानंतर खडबडून जागे झालेल्या महावितरण विभागाने आता यावर विभागीय चौकशी समिती नियुक्त केली असून येत्या ८ दिवसांमध्ये या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त होणार आहे. अशा पद्धतीने खासगी ग्राहकांची बिले नगरपालिकेच्या नावावर टाकून लाखो रुपयांचा अपहार झाल्याची चर्चा आता परळीत होत आहे.

खासगी विजबिलांची रक्कम नगरपरिषदेच्या नावावर असून, परळी शहरात वीजबिल घोटाळ्याचा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात खासगी ग्राहकांच्या वीजबिलांची रक्कम थेट नगरपरिषदेच्या नावावर टाकण्यात आल्याची माहिती असून, यामध्ये महावितरण आणि नगरपालिकेतील काही कर्मचाऱ्यांचे संगनमत असल्याचा आरोप आहे.

या घोटाळ्यात लाखो रुपयांचा अपहार झाल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते ब्रह्मदेव चाटे यांनी केली आहे. ब्रह्मदेव चाटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही खासगी ग्राहकांच्या वीजबिलांची रक्कम त्यांच्याच नावे न भरता नगरपरिषदेच्या खात्यात भरली गेली. विशेष म्हणजे ही रक्कम वसूलही करण्यात आली असून, ही योजना संगनमताने राबवण्यात आली असावी, असा संशय व्यक्त करण्यात येतो. याबाबतची लेखी तक्रार प्राप्त होताच महावितरण विभागाने तातडीने हालचाली करत विभागीय स्तरावर चौकशी समिती नियुक्त केली आहे. आठ दिवसांच्या आत समितीचा प्राथमिक अहवाल प्राप्त होणार असल्याचे अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत यांनी स्पष्ट केले.




# अल्पवयीन मुलीस विवस्त्र करत कुटुंबीयांना मारहाण

## परळी तालुक्यातील घटनां परळी ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील अल्पवयीन मुलीचे कपडे फाडत कुटुंबातील सदस्यांना मारहाण करत जीवे मारण्याची धमकी देण्याची घटना परळी तालुक्यात सारडगाव येथे समोर आली असून या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार तालुक्यातील सारडगाव येथील भावकीतील वादातून सोमवार दिनांक १६ रोजी सकाळी ७.३०.च्या सुमारास गावातील सर्वे नंबर ४०९ मध्ये यशवंत सोनाजी गवळी. प्रशांत श्रीराम गवळी.व ओमकेश श्रीराम गवळी. (सर्व रा.सारडगाव) यांनी संगणमत करून अंतोबा बाबू गवळी यांच्या शेतात जाऊन त्यांना फिर्यादीचा भाऊ सुधीर व आई रुक्मिणी हिस शिविगाळ करुन लाकडी दांड्याने. लाथाबुक्क्यांनी मारहाण करत अंतोबा गवळी




पान २ वर

# दारूच्या नशेत तरुणीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास सिरसाळा पोलिसांनी केली अटक

सिरसाळा । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सिरसाळा पोलीस स्टेशन हद्दीतील दिग्रस गावात एक या १९ वर्षीय तरुणीवर अत्याचार झाल्याची घटना काल दिनांक १८रोजी घडली आहे. घरात कोणी नसल्याचा फायदा घेत नराधमाने घरात घुसून लज्जास्पद वर्तन केले. याविषयी तरुणीने दिलेल्या फिर्यादीवरून सविस्तर वृत्त असे की दि.१८.६.२०२५. रोजी सकाळी ११. वाजण्याच्या सुमारास पीडित तरुणी घरी एकटी होती दरम्यान दिग्रस गावातीलच शेजारी राहणारा लक्ष्मण बाबुराव कसबे वय ४५ वर्षे राहणार डिग्रस हा घरात घुसला व ए पोरी काय करायलीस असे म्हणून डोळा मारला व पाठीमागे मागून मिठी मारून लज्जा पाटील अशी कृती केले.

तेव्हा पिढीत घाबरून त्यास बाजूला ढकलून बाहेर पळत बाहेर उभ्या शेजारी असलेल्या दोन महिलांना घडलेली घटना सांगितली. त्यानंतर त्या महिलांनी तिथे थांबलेल्या एका युवकाचा फोन वरून पीडीतेच्या आई–वडिलांना बोलवण्याकरिता शेतात पाठवले. त्यानंतर पिढीतेचे आई–वडील काही वेळाने घरी आले.घडलेली हकीकत सांगितली. तक्रार आई–वडील इतर काही मंडळींनी पिढीतेचे सिरसाळा पोलीस स्टेशन येथे घेऊन गेले. पीडीतेच्या रीतसर फिर्यादीवरून सिरसाळा पोलीस स्टेशन मध्ये नराधम आरोपी लक्ष्मण बाबुराव कसबे यांचेविरुद्ध कलम भारतीयन्याय संहिता ७४.७५.३३३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सह पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांच्या मार्गदर्शनात पोलीस कॉन्स्टेबल सुशांत सोनवणे हे करत आहेत.

# बीडच्या राजकारणातील 'भिष्माचार्य' शिवाजी दादांचा नातू जिल्हा परिषदेचे मैदान गाजवणार?

## धोंडराई जिल्हा परिषद गटातून रणवीर अमरसिंह पंडित यांच्या नावाची चर्चा?



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघात अनेक निवडणूकीत शिवछत्र परिवार व माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी या मतदारसंघात वर्चस्व गाजवले आहे. जिल्ह्याच्या राजकारणातील सर्वात जेष्ठ असलेले माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी वयाची ८७ वी पुर्ण केली असली तरी राजकीय, सामाजिक, शिक्षण आदी क्षेत्रांतील त्यांचा वावर कायम आहे. या वयातही मराठा आरक्षणाबाबत सर्वव्यापी आंदोलनात तर कुस्तीच्या फडात हालगी वाजल्यानंतर पैलवानाच्या भाया जशा फुरफुराव्यात तसे शिवाजीराव पंडित यांचे कार्य होते. म्हणूनच त्यांना बीडच्या राजकारणातील 'भिष्माचार्य' अशी बिरुदावली चाहत्यांकडून लावली गेली आहे.

वयाच्या २५ व्या वर्षी राजकीय फडात उतरुन ५० वर्षे सक्रीय राजकारणात राहीलेल्या शिवाजीराव पंडित सक्रीय राजकारणातून निवृत्त झाले असले तरी शेती, समाजकारण, अधात्मिक कार्यात पुढे असतात. स्वत: उत्तम शेती करणारे शिवाजीराव पंडित शेतकऱ्यांचे मेळावे घेऊन शेतीचे धडेही देतात. तसेच शिवछत्र परिवाराच्या राजकारणाची सुरुवात ज्या धोंडराई गटातून प्रथम झाली या गटातून तिसऱ्या पिढीत अशातच आजोबांसासह वडिलांचा राजकीय वारसा जोपासत रणवीर अमरसिंह पंडित गेवराई तालुक्यात यांचा चांगला जनसंपर्क वाढविला आहे शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांच्या हितासाठी विविध खेळाच्या स्पर्धेच्या आयोजन शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्यांचें कार्य उत्कृष्ट आहे. महामानवाच्या जन्मोत्सवात अध्यक्षपदाची धुरा घेऊन काढलेल्या जयंती उत्सवाची चर्चा महाराष्ट्रभर रणवीर काका पंडित यांच्या अध्यक्षतेखाली गाजली होती. काकांचा स्वभाव अतिशय प्रेमळ आणि दिलदार आहे

पान २ वर

# माजलगाव ग्रामीण पोलीसांची वाळू चोरावर कार्यवाही

## चोवीस लाखाचा मुद्देमाल जप्त; महातपुरी शिवारातील गोदावरी नदी पात्रातून करीत होते वाळू उपसा

माजलगाव । प्रतिनिधी

पोलिस स्टेशन माजलगाव ग्रामीण हद्दीतील महातपुरी शिवारातील गोदावरी नदी पात्रातून १) आकाश राजाभाऊ शिंदे २) रमेश बाबासाहेब चव्हाण ३) छत्रभुज तुकाराम कोलते हे ट्रॅक्टरच्या सहाय्याने अवैद्य वाळू उपसा करून वाहतूक करीत आहेत अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून सदर ठिकाणी काल दि १६ रोजी सकाळी ५ वा. छापा मारला असता खालील वर्णनाचे ०३ ट्रॅक्टर व ट्रॉली मिळून आलेते खालीलप्रमाणे.



१) आकाश राजाभाऊ शिंदे रा. महातपुरी फार्मा कंपनीचे निळ्या रंगाचे ट्रॅक्टर हेड किंमत ६,००,०००/– रुव काळ्या रंगाची ट्रॉली त्यामध्ये ०१ ब्रास वाळू किंमत ६,०००/– रुव ट्रॉली किंमत १,००,०००/– रु असे एकूण ७,०६,०००/– रु. मुद्देमालासह मिळून आला. २) रमेश बाबासाहेब चव्हाण रा. माहातपुरी हा पोलीस रेड पार्टीस पाहून त्याच्या ताब्यातील महिंद्रा अर्जुन कंपनीचे लाल रंगाचे हेड

पान २ वर

# धारूर येथील मस्जीदच्या जमीनीत मोठा घोटाळा!

# खिदमस मासच्या ४४ एकर पैकी २२ एकरची बेकायदेशीरपणे विक्री?

## जमिन घेणाऱ्या असद जिलानी कुरेशींवर कायदेशीर कारवाई करण्याची सादेक इनामदार यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

धारूर । प्रतिनिधी

धारुर येथील मस्जीदची खिदमत मास ईनामी जमीन सर्व्हे नं. ६१० व ५५६ बेकायदेशीर खेरदीखत करणार्यावर कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि सादिक बाबामिया ईनामदार यांनी केली आहे. याबाबत त्यांनी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समिर काझी आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना लेखी पत्र दिले आहेत. सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी शैलेश सुर्यवंशी यांनी सादिक इनामदार यांचे पत्र स्विकारले आहे.

किल्ले धारूर येथील सर्व्हे नं. ६१० व ५५६ ही जमीन मस्जीदची खिदमत मास ४४ एकर जमीन असून ती त्या पैकी असद जिलानी कुरेशी यांनी ९९ वर्षाचा कौलनामा ४४.००००० लक्ष रुपयांमध्ये २२ एकर जमीन प्रति एकर २,००००० रुपये प्रमाणे बेकायदेशीर विकत घेतलेली आहे. ती पूर्णपणे बेकायदेशीर असून शासनाची फसवणूक करुन बॉन्डवरती नोटरी करुन करार केलेला आहे. वक्फ अधिनियम १९९५ च्या कायद्यान्वये खरेदी करणारे असद जिलानी कुरेशी यांच्या वरती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. सादिक बाबामिया ईनामदार यांनी केली आहे. अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असाही ईशारा यावेळी त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिला आहे.



# ठेवीदारांच्या मृत्यूचा आकडा वाढल्यावर निगरगट्ट प्रशासनाला जाग येणार का ? : प्रा. सचिन उबाळे

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट, पतसंस्थांमध्ये मेहनतीचा पैसा अडकल्याने आर्थिक विवंचनेत सापडलेल्या ठेवीदारांनी मृत्यूला जवळ केले आहे. गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील शेतकऱ्याने आज आत्महत्या करुन जीवन संपविले. या मल्टिस्टेटवाल्यांनी जिल्ह्यात आणखी एकाचा बळी घेतला आहे. ठेवीदार जीव देत आहेत, मात्र निगरगट्ट प्रशासन केवळ कागदोपत्री कारवाई करत असून ठेवीदारांच्या मृत्यूचा आकडा वाढल्यावर प्रशासनाला जाग येणार का ? असा सवाल स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक प्रा.सचिन उबाळे यांनी केला आहे. दरम्यान, ठेवीदारांनी संयम बाळगावा. कितीही आर्थिक अडचणी आल्या तरी टोकाचा निर्णय घेऊ नये. ठेवीदारांना ठेवी परत दिल्याशिवाया शांत बसणार नाही असेही प्रा.उबाळे यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट,छत्रपती मल्टिस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव)आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांनी या मल्टीस्टेटवर मोठा विश्वास ठेवून गुंतवणूक केली. मात्र मल्टीस्टेटवाल्यांनी ठेवीदारांच्या मेहनतीच्या पैशांची लूट केली. हातावर पोट असलेल्या ठेवीदारांनी घाम गाळून कमावलेले पैसे मल्टीस्टेटमध्ये ठेवी ठेवल्या. मात्र मल्टीस्टेट दिवाळखोरीत निघाल्याने अनेकांवर आर्थिक संकटांचा तोंड देण्याची वेळ आली आहे. यातच गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील सुरेश जाधव या ४२ वर्षीय शेतकऱ्याने छत्रपती मल्टिस्टेटच्या गेवराई शाखेसमोर गळाफास घेऊन आत्महत्या केली.

यापूर्वीही बीडसह जिल्ह्यात ठेवीदारांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या असून अनेकांनी धास्तीने जीव सोडला आहे. जिल्ह्यातील मल्टीस्टेट प्रकरणी जिल्हा प्रशासन अत्यंत संथ गतीने कारवाई करत आहे.निगरगट्ट प्रशासन केवळ कागदोपत्री कारवाई करत असून ठेवीदारांच्या मृत्यूचा आकडा वाढल्यावर प्रशासनाला जाग येणार का ? असा सवाल स्वाभिमान संघटना जिल्हाप्रमुख बीड तथा ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मूख्य प्रवर्तक प्रा.सचिनभैय्या उबाळे यांनी केला आहे.

# कृषी महाविद्यालयांच्या कृषी दुतांनी शेतकऱ्यांना पटवून दिले कृषी ॲपचे महत्त्व

दगडी शहाजणपूर । प्रतिनिधी

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी आणि शेतीत कृषी ऍपच्या वापराची माहिती देण्यासाठी दगडी शहाजणपूर येथे आयोजित प्रात्यक्षिक उपक्रमाला आज उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सौ के.एस. के काकू कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुतांनी शेतकऱ्यांना कृषी ऍप चा वापर कसा करावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.




गावचे सरपंच श्री. अण्णासाहेब धुतमल यांच्यासह २० ते २५ ग्रामस्थांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमात शेतकऱ्यांना कृषी आपद्वारे हवामान अंदाज, पीक व्यवस्थापन, बाजारभाव, शेतीविषयक योजना आणि तज्ज्ञांचा सल्ला यासारख्या सुविधांचा लाभ कसा घ्यावा, याबाबत प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देण्यात आली. कृषी दुतांनी शेतकऱ्यांना आप डाउनलोड करणे, नोंदणी करणे आणि त्याचा दैनंदिन शेतीत वापर कसा करावा, याचे साधे-सोपे प्रशिक्षण कृषिदूत नितीन ढुमणे, महेश गवसने, ओम देवकर, सोहम धानापुणे , विवेकानंद गाडे, विश्वजीत देशमुख, कार्तिक काकडे, व गावकरी सहभागी होते उपक्रमाला गावचे सरपंच श्री. आण्णासाहेब धुतमल यांच्यासह महाविद्यालयाचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंखे सर, प्राचार्य डॉ. एस. पी. मोरे सर, कार्यक्रम समन्वयक प्रा. डॉ. एस. टी. शिंदे सर,
प्रा.एस.वी राठोड सर, प्रा.बी बी तांबोळकर सर.प्रा.पी.बी मांजरे सर, प्रा. डॉ. पी. ए. गायकवाड मॅडम, प्रा. बी. आर. चादर मॅडम डॉ जी.एम. बोडखे सर आणि उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. बी.बी.तांबोळकर सर, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी शेतकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञानाचा अवलंब करून शेतीत उत्पादकता आणि नफा कसा वाढवता येईल, यावर प्रकाश टाकला. सरपंच श्री. आण्णासाहेब धुतमल आणि गावकऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था, बीड व माहेश्वरी प्रगती मंडळ बीड द्वारा आयोजित जागतिक योगदिनानिमित्त योगसाधना कार्यक्रमाचे आयोजन

## बीड शहरवासियांनी योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित रहावे

बीड । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था,बीड तथा माहेश्वरी प्रगती मंडळ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने अकराव्या जागतिक योग दिवसानिमित्त शनिवार दि. २१ जुन २०२५ रोजी सकाळी ठीक ०५.४५ ते ०७.०० या वेळेत वृंदावन लॉन्स, एमआयडीसी रोड, बीड येथे मोफत योग शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी बीड शहरातील योगप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था बीडचे अध्यक्ष विष्णुदास बियाणी, महामंत्री योग प्रशिक्षक ड. डॉ. राजेन्द्र सारंडा,उपाध्यक्ष सुरज लाहोटी, सचिव , कोषाध्यक्ष उमेश कासट,सह सचिव संतोष सोहनी, प्रकल्प सभापती अमर सपकाळ, माहेश्वरी प्रगती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कासट, उपाध्यक्ष संतोष टवाणी, सचिव जुगल किशोर बियाणी, कोषाध्यक्ष जगदीश सिकची, सहसचिव राजेन्द्र चरखा, प्रकल्प सभापती सी.ए. गोपाल कासट, डॉ. बद्रीनारायण झंवर, भगिरथ चरखा, ईश्वर चरखा, नंदकिशोर जेथलिया, गणेश कासट, गोविंद लाहोटी, हरीश मालू, संजय मुंदडा, राम मानधने, रवी राठी, अशोक सिकची, रमेश सोमानी, अनिल वट्टमवार, , अजिंक्य चांदणे, शेखर महाद्वार, अशोक राऊत, चांदणे बंधू, शिवाजी भुरे, नागेश मिटकरी, अशोक शहागडकर, सुनील मिटकरी, नवनाथ गोरे, सुनील टाक, गुरुप्रसाद शहाणे, शिवलिंग क्षीरसागर, गंगाबिशन करवा, बद्रीनारायण मानधने, बालाप्रसाद जाजू, डॉ. रत्नपारखी, सुशील सुराणा, सुनील कोटेचा, गणेश कासट, डॉ. डुंगरवाल, डॉ. आखाडे, डॉ. तांबडे आदींसह दीपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था बीड व माहेश्वरी प्रगती मंडळ बीडचे पदाधिकारी, सदस्यांनी केले आहे.

यावेळी योग प्रशिक्षक तथा योगा संस्थेचे सचिवॅड. डॉ. राजेंद्र सारडा यांचे योगिक क्रियाद्वारे ताण-तणावमुक्ती, मधुमेह, दमा यावर नियंत्रण व उपाय याविषयावर शास्त्रोक्त पध्दतीने विवेचन होणार आहे. तरी दिपमाळ योगा बहुउद्देशीय संस्था व माहेश्वरी प्रगती मंडळाच्या वतीने या जागतिक योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बीड शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून योगसाधना कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# आष्टी येथील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक तात्यासाहेब पोकळे यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीचे माजी सदस्य जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक तात्यासाहेब पोकळे (वय ९८) यांचे वृध्दापकाळाने बुधवार दि.१८ जुन रोजी निधन झाले. त्यांच्यापठीमागे बेलगावचे माजी सरपंच तथा भाजप नेते कल्याण पोकळे हा मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा मोठा परिवार आहे. यावेळी महसुल प्रशासनाच्या वतीने पुष्पचक्र अर्पण करुन मानवंदना तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिली.



सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी श्रध्दांजली अर्पण केली. बेलगाव येथे म्हसोबामळा येथे सकळी ११ वा. अंत्यविधी झाला. यावेळी माजी आ.साहेबराव दरेकर, देविदास धस, राजेंद्र धोंडे, किशोर हंबर्डे, तहसिलदार वैशाली पाटील, जयदत्त धस, नायब तहसीलदार जयदत्त चव्हाण, काकासाहेब शिंदे, भाऊसाहेब लटपटे, श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, प्राचार्य डा.सोपान निंबोरे, ड.बाबुराव अनारसे, आण्णासाहेब श्रीखंडे, पाथर्डीचे राहुल कारखेले, आण्णासाहेब नाथ, हरिभाऊ मार्केडे, भरत जाधव, चेअरमन बाळासाहेब शिंदे, खंडुदादा जाधव, सुनिल नाथ, गणेश शिंदे, कल्याण काकडे, अमोल शिंदे, पत्रकार उत्तम बोडखे, प्रविण पोकळे, विक्रम पोकळे, शिवाजी वाडेकर, दादासाहेब मुटकुळे, मेजर रावसाहेब पोकळे, अशोक पोकळे, सुभाष गणगे, सीताराम पोकळे, बबन करांडे, बाळासाहेब थोरवे,डा.राजेंद्र जरांगे, सरपंच अशोक मुळे, पिनु धनवडे, बन्शीभाऊ पोकळे, संजय पोकळे, प्रा.अमृत पोकळे आदि मान्यवर उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना बीजांकुरण याबद्दल मार्गदर्शन

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत कार्यरत असलेल्या सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के.) कृषी महाविद्यालय, बीड येथील विद्यार्थ्यांनी खापर पांगरी गावात शेतकऱ्यांसाठी बीजप्रक्रिया आणि बीजांकुरण यावर मार्गदर्शनपर प्रात्यक्षिक आयोजित केले. या उपक्रमाला गावातील वीस ते पंचवीस शेतकरी आणि गावच्या सरपंच अंजना राम माने यांची उपस्थिती होती.

यावेळी कृषीदूत गणेश शिरसाट, विशाल शिंदे, माधव सानप, उज्जैर शेख, निखिल वाघचौरे आणि वज्रा लक्ष्मण यांनी शेतकऱ्यांना रासायनिक आणि जैविक पद्धतीने बीजप्रक्रिया कशी करावी, तसेच बीजांकुरण कसे दाखवले.

पान १ वरून...

### अल्पवयीन मुलीस ववस्त्र करत कुटुंबीयांना मारहाण

यांची पुतणी ही अल्पवयीन आहे हे माहीत असून ही अरोपी ओमकेश याने तिच्या अंगावर बसुन तिच्या पंजाबी टॉप फाडून तिला उघडी करण्याचा प्रयत्न करत इतरांनी लाकडी दांड्याने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

याप्रकरणी अंतोबा गवळी यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरन.२६९/२०२५.कलम ७६.११८ (१)११५(२).३५१.(२).३५१.(३).३ (५)इछड सह कलम ८ पोस्को प्रमाणे चार व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शेख हे करीत आहे.

### बीडच्या राजकारणातील 'भिष्माचार्य' शिवाजी दादांचा नातू जिल्हा परिषदेचे मैदान गाजवणार?

लोकांच्या समस्यांची जाण असणारा नेता म्हणून आणि सहज उपलब्ध होणारा भावी जिल्हा परिषद अध्यक्ष अशी पदवी देऊन येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत ओपन जागेवर जिल्हा परिषद सदस्य पदासाठी निवडणूक लढवावी अशी सोशल मीडियाच्या माध्यमातून चर्चा व तसेच धोंडराई गावातील जनसामान्याची व गोरगरिबाची तसेच शेतकऱ्याची मागणी आहे.

### माजलगाव ग्रामीण पोलीसांची वाळू चोरावर कार्यवाही

किंमत ७,००,०००/- लालव पिवळ्या रंगाची ट्रॉली किंमत १,००,०००/- असे एकूण ८,००,०००/- रुपयाचा मुद्देमाल व त्यामधील वाळू खाली करीत असताना मिळून आला.

छत्रभुज तुकाराम कोलते रा. माहातपुरी याच्या ताब्यातून महिंद्रा अर्जुन कंपनीचे व लाल रंगाचे ट्रॅक्टर हेड किंमत ८,००,०००/- रुपयेव लाल व पिवळ्या रंगाची ट्रॉली किंमत १,००,०००/- रु. असे एकूण ९,००,०००/-रु.चा मुद्देमाल व त्यामधील वाळू पोलीस रेड पार्टीस पाहून खाली करत असताना मिळून आला. असे एकूण तीन ट्रॅक्टर एक ट्रॅक्टर मध्ये वाळू भरलेले व दोन ट्रॅक्टर मधील वाळू खाली करीत असताना मिळून आले असून एकूण किमत २४,०६,०००/- रु.चा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

संबंधित आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून मा. तहसीलदार यांना गौण खनिज अधिनियमानुसार येथील ग्रामीण पोलीस स्टेशन चे पी आय बालक कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय सोनवळे, पो हे उद्दव राऊत, पोअ गोविंद बाबरे, पो अ गणेश ठेंगल, पो अ किशोर खेत्रे यांनी सदरील कार्यवाही केली.

## टी.सी. हरवला आहे

सीमा मछिंद्र सोनवणे या नावाचा ११ पास ढ .उ चा हरवला आहे. माने कॉम्पलेक्स नाट्यगृह रोड प्रवासात हरवला आहे सापडल्यास संपर्क साधावा.

सीमा मछिंद्र सोनवणे
मो. ९९६०१९०३८४

## टी.सी. हरवला आहे

मयुरी अशोक सोळंके वर्ग १० वी या विद्यार्थिनीचा रुई धारूर बस धारूर ला येत असताना बस मध्ये ढ.उ हरवला आहे. जर कोणाला सापडला तर संपर्क साधा.

मयुरी अशोक सोळंके
९१३०१५१२००

# राज्यस्तरीय महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या ग्रंथास जाहीर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील प्रवर्तनवादी चळवळीतील आघाडीचे लेखक उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांच्या 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन २०२३-२०२४ या सालासाठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ' प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. या बाबतचे पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

यापूर्वी प्रा.गायकवाड यांच्या 'व्हि.जे.आरक' या ग्रंथास राज्यस्तरीय तृतीय, 'प्रज्ञासुर्याचे सुर्यपुत्र' या ग्रंथास राज्यस्तरीय प्रथम, 'बुध्द प्रबुद्ध विचारांच्या पाऊलखुणा' या ग्रंथास सन-२०२५ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' तृतीय पुरस्कार आणि 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन-२०२२ साठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकॅडमी' द्वितीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. एकाच संस्थेचे सलग चार पुरस्कार उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांना मिळाले आहेत. ही विशेष उल्लेखनीय बाब आहे. उपप्राचार्य प्रा.गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील आघाडीचे लेखक, कवी आणि विचारवंत आहेत. त्यांच्या समग्र व उल्लेखनीय कारकिर्दीची दखल घेत महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे यांचे अध्यक्ष ॲड.एल.टी.सावंत, जनरल सेक्रेटरी प्रा.आर.आर.सोनकांबळे आणि ग्रंथ पुरस्कार निवड समितीचे चेअरमन डॉ.दिपक गायकवाड यांनी या बाबत नुकतेच कळविले आहे. त्यानुसार या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक २२ जुन २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत इतिहास संशोधन मंडळ, भरत नाट्य मंदिराशेजारी, सदाशिव पेठ, पुणे येथे प्रमुख अतिथी दयानंद माने (निवासी संपादक, दैनिक सकाळ वृत्तपत्र मिडिया, पुणे) यांच्या हस्ते व माजी आमदार ॲड.एल.टी.सावंत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित एका विशेष समारंभात करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ.प्रकाश पवार (उपप्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज, पुणे) हे असणार आहेत.



या समारंभात उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड (प्रथम क्रमांक), जयराम सदाशिव खुने (द्वितीय क्रमांक) आणि बाबुराव नामदेव धांडोरे (तृतीय क्रमांक) या लेखकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. मागील ३५ वर्षांपासून महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था, पुणे या संस्थेच्या वतीने सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच भारतीय लोककल्याण कार्य आणि चळवळीबद्दल संस्था कार्यरत राहून पुरोगामी विचार प्रसार व प्रसारासाठी संस्था कार्यरत आहे. मागील अनेक वर्षांपासून म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या लेखकांकडून दिलेल्या पत्त्यावर ग्रंथ मागवून अभ्यासू व्यक्तिंकडून त्याचे परीक्षण करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढून पुरस्कार जाहीर व प्रदान केला जातो. अशा उत्कृष्ट लेखकांना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सन २०२३-२४ या सालासाठीचे प्रथम पुरस्कार प्राप्त प्रा.गौतम गायकवाड यांना यापुर्वीही डॉ.जगजीवनराम लेखक पुरस्कार (नेपाळ), प्रेरणा समीक्षा पुरस्कार (पुणे), समाजभुषण पुरस्कार (सोलापुर), उत्कृष्ट लेखक पुरस्कार (लातूर) आणि व्ही.जे.आरक या ग्रंथास राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. उपप्राचार्य प्रा.गायकवाड यांचे २२ हून अधिक पुस्तके, विविध वृत्तपत्र, नियतकालिकांतून नियमित प्रासंगिक लेखन, दहा पेक्षा अधिक ग्रंथांचे संपादन, त्यांनी केले आहे.

या सोबतच सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. अनेक चर्चासत्रात सहभाग घेत विविध नियतकालिकांतून त्यांचे सव्वा तिनशेहून अधिक लेख प्रकाशित झाले आहेत. नवोदित साहित्यिक, कवी यांना प्रोत्साहन देण्याचे तसेच त्यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी प्रसंगी सर्वोतोपरी भरीव सहकार्य करण्याचे कार्य देखिल प्रा.गायकवाड यांनी वेळोवेळी केले आहे. व्ही.जे.आरक सेवाभावी संस्था आणि परिवर्तन साहित्य मंडळाचे ते अध्यक्ष ही आहेत. तसेच 'परिवर्तन संशोधन' मासिकाचे कार्यकारी संपादक आहेत. परिवर्तन साहित्य संमेलनाच्या आयोजनात त्यांचा पुढाकार आहे. आगामी काळात ११ विविध विषयांशी संबंधीत ग्रंथ, काव्य संग्रह, प्रवर्तनवादी चळवळीला बळ देणाऱ्या ग्रंथाचे लेखक म्हणून ही ते ओळखले जातात. या सर्व विषयांवरील त्यांच्या विविध ग्रंथसंपदा या प्रकाशनाच्या वाटेवर आहेत. उपप्राचार्य प्रा.गौतम केरबा गायकवाड हे सध्या अंबाजोगाईतील खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि मराठी भाषा विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

मागील ३३ वर्षांपासून ते अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांनी नाटक, कथा, कविता, प्रासंगिक, संशोधन, संपादन, आंबेडकरी चळवळ संदर्भाने विपुल ग्रंथ व साहित्य संपदा निर्मिली आहे. त्यांना आता 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आंबेडकरी साहित्य (आकलन आणि अवलोकन)' या ग्रंथास सन २०२३-२०२४ या सालासाठी दिला जाणारा राज्यस्तरीय 'महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ' प्रथम पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांचे सामाजाच्या सर्वस्तरांतून अभिनंदन होत आहे.

## कोरोना से ड़रो ना

सुनने मे आ रहा है की, कोरोना को फ़ीर से लाना है
पता नही अब और कौनसा सितम ढ़ाना है
सुनने मे आ रहा है की, कोरोना को फ़ीर से लाना है
पता नही अब और कौनसा सितम ढ़ाना है
ये कैसे हुक्मराँ हुए – ये कैसे हुक्मराँ हुए
भविष्यव्यत्ता या फ़ीर फट्टू हुए
चाहे वो जो भी हुए – चाहे वो जो भी हुए
लेकिन अब जनता को ना जाने क्या कराना है
सुनने मे आ रहा है कि, कोरोना को फिर से लाना है
पता नही अब और कौनसा सितम ढ़ाना है
वक्त रहते जाग जा ऐ अवाम
वक्त .. रहते .. जाग जा ..... ऐ अवाम
वरना फिर घर मे बंद करवा दिया जायेगा तुम्हें
तुम घर मे बैठे कोरोना–कोरोना करते रहोगे
और वो हुक्मराँ ड़रोना–ड़रोना कहकर मज़ा लेते रहेंगे
क्यूँकी सुनने मे आ रहा है, कोरोना को फ़ीर से लाना है
पता नही अब और कौनसा सितम ढ़ाना है।

एस.एम.युसूफ़
पत्रकार, बीड़
मो. – ९०२१ ०२ ३१२१



# इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी व आश्रमशाळा चालकांच्या उदासीनतेमुळे आश्रम शाळेतील मुलांकडे दुर्लक्ष

## शाळा प्रवेशासाठी हार, सत्कार तर दुरच निदान आस्थेने विचारपूस तरी करायला हवी : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

शाळा प्रवेशाच्या निमित्ताने संपुर्ण राज्यभर जिल्हा परिषदेच्या व खासगी संस्थेच्या शाळा मध्ये दि.१६ जुन रोजी नविन मुलांच्या प्रवेशासाठी जिल्हा प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मोठ्या उत्साहात चिमुकल्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तक, वह्या, पेन आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. मात्र याचवेळी राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या ९७७ आश्रमशाळां मधील विद्यार्थ्यांचा जिल्हा प्रशासन तसेच शिक्षण विभागाला विसर पडल्याचे दिसून आले. या विभागामार्फत विमुक्त भटक्या जमाती विशेष मागास प्रवर्गाच्या आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला मुलींसाठीच्या निवासी शाळा, विद्यानिकेतन, निवासी कनिष्ठ महाविद्यालय आहेत. याठीकाणी विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी अधिकारी वर्ग सुद्धा उपलब्ध आहे. मात्र शाळा प्रवेशाच्या आनंद महोत्सवात बोटावर मोजण्याईतक्या शाळा वगळता बहुतांश शाळांमध्ये हा उत्सव साजरा करण्यात आलाच नाही. त्यामुळे आश्रम शाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच



आहेत का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला आहे.

बीड जिल्ह्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत भटक्या व इतर मागास बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना निवासी व अनिवासी मोफत शिक्षण मिळावे या हेतूने बीड जिल्ह्यातील ३० संस्थे अंतर्गत ४५ प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रम शाळा कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात ४५ आश्रम शाळा मधून १० हजारापेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत असल्याची नोंद आहे. बीड जिल्ह्यात प्राथमिक शाळांची संख्या २३ असुन त्यात निवासी विद्यार्थी संख्या २५०० तसेच माध्यमिक शाळांची संख्या १४असुन त्यातून १००० पेक्षा जास्त आणि उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थी संख्या ०८ असुन निवासी विद्यार्थी संख्या ५०० पेक्षा जास्त आहे. तर जिल्ह्यातील आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थ्यांची संख्या ५००० पेक्षा जास्त आहे.

**आश्रमशाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का? : डॉ.गणेश ढवळे**

आश्रम शाळेतील निवासी विद्यार्थ्यांकरीता शासनाकडून प्रति विद्यार्थी २२०० रूपये प्रतिमाह परिपोषण अनुदान देत आहे.वसतिगृहात निवास व्यवस्था यामध्ये अंथरूण, पांघरूण,गादी, सतरंजी, ब्लँकेट तसेच भोजनाची व्यवस्था म्हणून ताट, वाटी, पेला, शैक्षणिक साहित्य यामध्ये वही, पेन, पाटी, पेन्सिल, विद्यार्थ्यांना २ शालेय गणवेश, नाईट ड्रेस तसेच केस कर्तन, तेल, साबण, दंतमंजन, कोलगेट यासह वैद्यकीय सुविधा म्हणून प्रथमोपचार तसेच करमणुक व खेळाचे साहित्य, पर्यायी विद्युत व्यवस्था, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, सौर ऊर्जा उपकरणे आदी सुविधांसाठी लाखो रुपयांचा खर्च केल्याचे दाखवते. मात्र ब-याच आश्रम शाळेतील सीसीटीव्ही केवळ दिखावा असुन बंदच असतात. आश्रम शाळेतील निकृष्ट आहाराच्या तक्रारी आढळतात.भौतिक सुविधांची वानवा आढळून येते. शासन विद्यार्थ्यांवर खर्च करत असताना इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी आश्रमशाळा चालकांशी संगनमताने तक्रारींकडे व मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करत असल्याने आश्रमशाळा केवळ अनुदान लाटण्यासाठीच आहेत का?? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

**इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिकारी आणि आश्रमशाळा चालकांच्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांच्या पदरी निराशाच :- धनंजय सानप**

शैक्षणिक विषमतेची दरी नष्ट करत सामाजिक ध्रुवीकरण नष्ट करण्यासाठी सयाजीराव गायकवाड,, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, सावित्रीबाई फुले आदिंनी पुढाकार घेत भटक्या समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेतला. मात्र सद्यस्थितीत मागास प्रवर्गातील आश्रमशाळेतील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी असणारे प्रशासकीय अधिकारी आणि स्वार्थी आश्रमशाळा संचालक यांच्या आर्थिक लालसेपोटी विद्यार्थ्यांच्या मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष होत असुन त्यांना शाळा प्रवेशासाठी होणा-या आनंदोत्सवात सुद्धा सहभागी करून घेण्याची आवश्यकता वाटत नाही. हे दुर्दैव असुन पुन्हा त्यांच्या पदरी निराशाच दिसून येत असल्याची खंत महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघाचे बीड जिल्हाध्यक्ष धनंजय सानप यांनी व्यक्त केली.



## भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो यांना मिळाला हिमालयीन योगा वर्ल्ड पिस पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

महाबोधी इंटर नॅशनल मेडिटेशन सेंटर (चखचउ) लेह लडाख येथे दि.१५.०६.२०२५ रोजी –जागतिक योगा व मेडीटेशन उत्सव–२०२५ झालेल्या कार्यक्रमात पूर्णा येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे अध्यक्ष, भदन्त डॉ. उपगुप्त महाथेरो यांना हिमालयीन योगा वर्ल्ड पिस पुरस्कार बिहारचे राज्यपाल महामहिम आरिफ महम्मद खान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाबोधी इंटर नॅशनल मेडिटेशन सेंटर, लेह–लडाखचे संस्थापक अध्यक्ष भिक्खू संघसेना हे होते. संस्थेच्या विद्यमाने सर्वप्रथम महामहीम राज्यपाल आरिफ महम्मद खान यांचा स्मृतिचिन्ह, शाल देऊन सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक भन्ते संघसेना यांनी केल्यानंतर मा. राज्यपाल यांचे योगा व विपस्सना बद्दल समायोचित भाषण झाले या कार्यक्रमासाठी भारत–नेपाळचे राजदूत डॉ. शंकरप्रसाद शर्मा, लडाखचे खासदार हाजी हानिफा जन, डॉ. सदनामसिंग संधु (राज्यसभा सदस्य तथा चंडीगड विद्यापिठाचे कुलगुरू) तसचे लडाख बुध्दीस्ट असोसिएशनचे प्रसिडेंट मा.श्रींग डोरजे लकरूक, मिनिस्ट्री ऑफ आयुष मंत्रालय भारत सरकारचे डॉ. राधेंद्र रॉय, डायरेक्टर, हेल्थ सर्विसेस लडाखचे डॉ. ताशी थिनलेंस, हिमांशु सोनी – सिने अभिनेता–मुंबई, व्हाईस चॅन्सलर लडाखचे प्रोफेसर पुष्पा, ॲडिशनल सेक्रेटरी ण.ढ. लडाख विक्रमसिंग मलिक व इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांच्या राष्ट्रीय एकात्मा या सांस्कृतिक कार्यक्रमाने सांगता झाली. महाराष्ट्र व देशात बौद्ध धम्म प्रसारक पु भन्तेजी यांना पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल बीड जिल्ह्यातील पु भन्तेजी धम्मशील प्रा प्रदिप रोडे, राजेंद्र घोडके, चंद्रकांत इंगळे, ॲड अनंतराव जगतकर, नागेश जौंधळ, प्रा गौतम गायकवाड, प्रा.बालाजी जगतकर यांनी अभिनंदन केले आहे.

## शाळेच्या पहिल्या दिवशी श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत

धारूर । प्रतिनिधी

दि.१६ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली व शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेश उत्सव येथील श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये पार पडला यावेळी उन्हाळ्याची सुट्टी पूर्ण करून विद्यार्थी परत आपल्या शाळेत परतत असल्याने विद्यार्थ्यांचे शाळाच्यावतीने मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर आनंद दिसून येत होता.



शैक्षणिक वर्ष २०२५–२६ हे दि.१६ जून पासून सुरु झाले आहे उन्हाळ्याच्या सुट्ट्या संपल्या आणि परत पुन्हा शाळा सुरू झाली असून येथील श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळात येणार्या विद्यार्थ्यांच्या हस्ते फित कापून शाळेत प्रवेश करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांचे औक्षण करून पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत शिक्षकांच्या वतीने करण्यात आले यावेळी विद्यार्थ्यांमध्ये आनंदआणि उत्साह दिसून आला उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षकांच्यावतीने पुढील वर्षीच्या शैक्षणिक वाटचालीस विशेष शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब राठोड सहशिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्कल अध्यक्ष आणि कार्याध्यक्षांच्या निवडी जाहीर

### पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र बहाल

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आगामी निवडणुका लक्षात घेता पक्ष आणि संघटन बांधणीच्या कामाला वेग आणला आहे. पक्षाचे सर्वेसर्वा आणि देशाचे नेते शरदचंद्र पवार तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून आणि जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अनुमतीने परळी तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष यांच्या नव्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. पक्षाच्या शहरातील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी त्यांनी सर्वांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने वेगाने कामाला लागला असून, पक्ष आणि संघटन बांधणीला गती देण्यात आली आहे. यावेळी पक्षाचे नेते राजेभाऊ फड, तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तम दादा माने, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यू.फड, मुक्ताराम गवळी, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून टप्प्या टप्प्याने निवडी जाहीर करण्यात येत आहेत. बुधवार, दि.१८ जून रोजी परळी वैजनाथ तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे अध्यक्ष तथा कार्याध्यक्ष यांच्या निवडी करण्यात आल्या. यामध्ये दादाहरी वडगाव सर्कल अध्यक्षपदी बब्रुवान आघाव, सर्कल कार्याध्यक्षपदी शिवाजी शिंदे, पिंपरी बुद्रुक सर्कल अध्यक्षपदी दत्ता चव्हाण तर कार्याध्यक्षपदी प्रकाश मुंडे, सिरसाळा सर्कल कार्याध्यक्षपदी बाळासाहेब पवार तर अध्यक्षपदी सय्यद अजमत सय्यद आबेदाली, नागापूर सर्कल कार्याध्यक्षपदी विलास तेलंग तर अध्यक्षपदी पंडित मुंजाजी भोसले यांच्या निवडी करण्यात आल्या तर तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या सिरसाळा शहराच्या अध्यक्षपदी फिरोज शेख यांची निवड घोषित करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र देण्यात आले असून, वरिष्ठांनी सर्वांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.



## राजेश जी घोडे यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

सेना प्रमुख आझाद क्रांती सेना मा.राजेश जी घोडे साहेबांना आंबेडकरी चळवळीतील योगदानाबद्दल छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार २६ जून २०२५ रोजी रुबी हॉटेल नवीन नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने दुपारी १२:०० वाजता हा पुरस्कार अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स कडून नांदेड येथे देण्यात येणार आहे. तरी या पुरस्काराबद्दल झुंजार सेनानी राजेश जी घोडे साहेबांचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे, व पुढील कार्यासाठी भरघोस शुभेच्छा देण्यात येत आहेत.



बीड : यशवंत उद्यान येथे हल्दीघाटी विजय दिवस निमित्त शौर्य चे प्रतीक विरशिरोमणी श्री महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास अभिवादन करतांना सोनलताई पाटील, जयसिंह मामा चुंगडे, लक्ष्मणसिंह ठाकूर, अनूप बुंदेले, प्रणव बुंदेले, ओम बुंदेले, श्रेयस बुंदेले आदी उपस्थित होते.


## प्रेम बळीराम राठोड हा विद्यार्थी बेपत्ता, दिसल्यास संपर्क करा

बीड । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील शेलु तांडा या ठिकाणचा विद्यार्थी प्रेम बळीराम राठोड वय २० सदरील विद्यार्थी माजलगाव शहरातील आयटीआय कॉलेज ला द्वितीय वर्षे या शैक्षणिक क्षेत्रात आहे, सदर विद्यार्थी महाविद्यालयात गेला पण तो घरी परतलाच नाही गेली दोन दिवस झाले आहे.

नातेवाईक त्यांचा शोध घेत आहेत तरी नातेवाईकांना त्या विद्यार्थ्यांचा शोध लागत नाही, पोलीस कम्प्लीट केली आहे जरी कोणाला हा विद्यार्थी आढळून आल्यास नातेवाईकांची संपर्क करण्याचा आव्हान केला आहे, सदर नंबर वर संपर्क करा, ९५७९२१८०१८ हा लागला नाही तर दुसरा नंबर लावा, ९९६०८७०४८४. या नंबर वर संपर्क करा, असे नातेवाईकांनी संपर्क करण्याचा आव्हान केला आहे.



आज महावितरण विभागीय कार्यालय बीड या ठिकाणी कार्यकारी अभियंता श्री सुबोध डोंगरे रुजू झाले. त्याबद्दल त्यांचा सत्कार करताना मा जि प सदस्य ॲड प्रकाश दादा कवठेकर, भाऊसाहेब निंबाळकर, महादेव गित्ते, इस्माईल शेख सर आदी.

## राजमाता जिजाऊ महाविद्यालयात अँटी रॅगिंग क्यूआरकोड आधारित सुविधा

धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांमध्ये अँटी रॅगिंग विषयी जनजागृती होण्यासाठी धारूर पोलीस स्टेशनच्या वतीने क्यू आर कोड आधारित सुविधांची माहिती धारूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. देवीदास वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना दिली. शिक्षण घेत असताना विद्यार्थी व विद्यार्थिनींना येणाऱ्या विविध अडचणी व समस्यांविषयी क्यूआरकोडच्या माध्यमातून पोलीस स्टेशनमध्ये न जाता विद्यार्थी व विद्यार्थिनींना तक्रार नोंदविता येणार आहे. याविषयीची प्रक्रिया धारूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. देवीदास



वाघमोडे यांनी माहिती दिली. यावेळी उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना विद्यार्थ्यांसाठी पोलीस स्टेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सुविधांचा विद्यार्थ्यांनी आपल्यावर अन्याय झाल्यास योग्य प्रकारे उपयोग करावा असे आवाहन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल.बी. जाधवर, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर, धारूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

## मुंबई येथे झालेल्या कराटे बेल्ट परीक्षा व रेफरी परीक्षेत चॅम्पियन कराटे अकॅडमीचे ११ विद्यार्थी उत्तीर्ण

माजलगाव । प्रतिनिधी

मुंबई येथे दि. १५/६/२०२४ रोजी कराटे आर्गनाइजेशन ऑफ इंडिया मुंबई यांच्या वतीने कराटे बेल्ट परीक्षा व रेफरी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेमध्ये माजलगाव येथील चॅम्पियन कराटे अकॅडमीच्या एकूण ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या दोन दिवशीय चाललेल्या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय परिश्रम व मेहनत घेत बेल्ट व रेफरी परीक्षा उत्तीर्ण केली .

या बेल्ट व रेफरी परीक्षचे आयोजन आयोजक क्योशी, अबूसद सर, अणि सेंसाई सोहेल बागवान सर व फहीम बागवान सर यांनी केले होते. मुंबई येथे नुत्त्याच पार पडलेल्या बेल्ट व रेफरी परीक्षेमध्ये मांजलगांव चॅम्पियन कराटे अकॅडमी माजलगावच्या ११




विद्यार्थ्यांनी परीक्षेमध्ये यश संपादन केले आहे. या परीक्षेमध्ये अमन मोमीन, रय्यान मोमीन, अदनान शेख, लारेब शेख, सोफिया शेख, जोया शेख, अली शेख, अनस बागवान, उमर शेख उमेर शेख या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सम्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्राप्त करून अपले वर्चव कायम राखले. या विद्यार्थ्यांना क्योशी अबुसद सर व सेनसाई सोहेल बागवान सर यांनी प्रमाणपत्र, बेल्ट, सन्मान चिन्ह व टी–शर्ट देऊन सर्व विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढवले. तर हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी फहीम बागवान सर यांनी परिश्रम घेतले.

# एस पी साहेब, बीड शहर पोलिसांना चोरांचं आव्हान?

## शितल कुमार बल्लाळ साहेब बीड शहर पोलिसांना गेल्या एक वर्षापासून चोर का सापडत नाहीत?

## जिल्हा रुग्णालयात गेल्या एक वर्षापासून चोऱ्या; सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याची मागणी तीव्र

### बीड शहर पोलिसांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनाला पत्र दिल्याची माहिती; बीड शहर पोलिसांनी जिल्हा रुग्णालयाला पत्र देण्याऐवजी चोराचा शोध का घेत नाहीत?



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. दररोज सरासरी दहा चोऱ्या होत असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली असून, या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी बीड शहर पोलीस ठाण्याने रुग्णालय प्रशासनाला सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे पत्र दिले अशी माहिती समोर आली आहे. रुग्णालयाच्या विविध वि वॉर्डांमध्ये महिलांचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन्स अशा मौल्यवान वस्तूंची चोरी सातत्याने होत असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. सीसीटीव्ही नसल्याने चोरट्यांना कुठलाही अडथळा न वाटता आपली कृत्ये पार पाडता येत असल्याचे चित्र आहे. रुग्णालय प्रशासन मात्र या गंभीर प्रकारांकडे दुर्लक्ष करत असल्याचे आरोप होत आहेत. चोरीनंतर रुग्णालयाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्यामुळे



आम्ही चोरांना मोकळे रान देतो आहोत का? असा सवाल उपस्थित होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक वॉर्डात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी जोरदार मागणी रुग्ण व नातेवाईकांकडून केली जात आहे. पोलीस प्रशासनाने दिलेल्या पत्राची जिल्हा रुग्णालय प्रशासन दखल घेते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. रुग्णांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा मुद्दा अत्यंत गंभीर असून, तात्काळ उपाययोजना न झाल्यास याचे परिणाम गंभीर होऊ शकतात, असा इशारा नागरिकांकडून दिला जात आहे.




बीड शहर पोलिसांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांना प्रत्येक वार्डामध्ये कॅमेरा बसा म्हणून पत्र दिलेले आहे खरे परंतु पत्र देऊन पोलिसांनी एक चांगली कामगिरी केली आहे का असा प्रश्न आता नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. बीड जिल्हा रुग्णालयातून गेल्या एक वर्षापासून गळ्यातले सोन चांदी चे दागिने पेशंटच्या जवळ असलेले मोबाईल पर्स पॉकेट व बीड जिल्हा रुग्णालयांमध्ये येत असताना आणलेल्या स्वतःच्या टू व्हीलर छोटे-मोठे वाहनाच्या बॅट्या स्टेफनी चोरून येण्याचे प्रमाण वाढलेले आहे. परंतु बीड शहर पोलिसांना आता चोरांनी आव्हान दिल्याचे चित्र स्पष्ट झालेले आहे. पोलिसांना पत्र द्यायला वेळ आहे परंतु चोर गेला एक वर्षापासून का सापडत नाही असा सवाल आता नागरिकांमध्ये होत आहे. त्यामुळे बीड शहर पोलीस ठाण्याचे पिआय शितल कुमार बल्लाळ व सर्व कर्मचाऱ्यांची एक मीटिंग घेऊन गेले एक वर्षातील आणण्यासाठी आदेश करावा अशी नागरिकांची मागणी होत आहे.

# हिवरसिंगातील घरकुलासाठी मोफत वाळू उपलब्ध करावी

## शिवराम राऊत, रामेश्वर पांडूळे यांचे तहसिलदार यांना निवेदन

शिरूर । प्रतिनिधी

मौ.हिवरसिंगा-औरंगपूर ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास, इतर मागास वर्गीयांसाठी मोदी आवास,रमाई घरकुल योजना तसेच शासन निर्देशा प्रमाणे घरकुल लाभार्थ्यांना किमान पाच ब्रास वाळू / रेती घरकुल बांधकामास ग्राम प्रशासन व महसुली प्रशासनाकडुन मोफत उपलब्ध करून देण्याच्या निर्णया नंतर मा.तहसिलदार शिरूर व गटविकास अधिकारी पं.स.शिरूर यांच्या आदेशान्वये पात्र लाभार्थ्यांची यादी पंचायत स्तरावरून जाऊन देखील लाभार्थ्यांना अद्याप ही वाळू उपलब्ध न झाल्याने श्री.शिवराम राऊत व श्री.रामेश्वर गांडूळे, श्री.अमोल शिंदे यांनी श्री.सुरेशराव घोळवे सर (तहसिलदार) शिरूर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन केले. ग्रां.प.अंतर्गत प्रधानमंत्री व मोदी आवास योजना अंतर्गत घरकुल मंजुरी होऊन देखील अनेक महिन्यापासुन केवळ



वाळू अभावी बांधकामे ठप्प आहेत. यासाठी लाभधारकांत असतोस निर्माण होत आहे.

जिल्हा प्रशासनाच्या रेती निर्धारण धोरणामुळे बीड जिल्ह्यातील वाळू पुरवठा बंद होता. शासनाने लाभार्थ्यांना मोफत रेती पुरवठा करण्याचा निर्णय करून देखील अनेक महिने लोटले तरीही जिल्हा प्रशासनाकडून या संबंधी नियमावलीच्या अभावी घरकुल धारकांना वाळू उपलब्ध होत नाही. या बाबतीत ग्राम प्रशासन ते महसुली प्रशासन उदासिन असल्यानेच हा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. शासनाच्या मोफत वाळू शिवाय घरकुल बांधकाम न करण्याचा निर्धार गरीब लाभार्थी करत आहेत. वेळ प्रसंगी लोकशाहीच्या सनदशीर मार्गाने उपोषण, रास्तारोको, ठिय्या आंदोलन करण्याची तयारी आहे. यासाठी बाबतीत प्रशासनाकडे जोरदार पाठपुरावा करून पात्र घरकुल लाभार्थांना पाच ब्रास वाळू मोफत मिळवून देण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याचा निर्धार करूनच मा.तहसिलदार यांना निवेदन केले आहे. या बाबतीत कर्तव्य तत्पर घोळवे सर नक्कीच घरकुल धारकांना लवकरात लवकर वाळू उपलब्ध करतील असा विश्वास शिवराम राऊत व रामेश्वर पांडुळे यांना दिला आहे.

# वडवणी पोलीस ठाण्याचे विलास खरात यांची जमादार म्हणून पदोन्नती

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी पोलिस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलिस म्हणून कार्यरत असलेले विलास खरात यांची पोलिस जमादार म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



गेल्या तीन चार वर्षापासून वडवणी पोलीस ठाण्याला पोलीस कर्मचारी म्हणून लाभलेले विलास खरात यांनी वडवणीत आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे सर्व परिचित झाले आहेत. विलास खरात यांनी बीड जिल्ह्यात नोकरी करत असताना आपल्या कामाच्या जोरावर सर्वांना आपलेसे करून सगळ्यात मिळून मिसळून राहून आपली कामे चोख करून आपल्या कार्याच्या जोरावर समाजात आपली चांगली छबी निर्माण केली आहे. त्यांच्या या मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी सर्वांचे मने जिंकले असून ते वडवणी पोलीस स्टेशनला कार्यरत असल्यापासून ते अत्यंत चाणाक्ष बुद्धीवान व चांगल्या काम करण्याच्या पध्दतीमुळे ते गेल्या दोन वर्षांपासून सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसाट यांच्या कार्यकाळामध्ये त्यांचे रायटर म्हणून चांगले काम केले आहे. त्याचबरोबर आताही सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हागाडे- शिंदे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे चांगले कार्य असून ते सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी आहे. तरी त्यांना काल पोलीस जमादार म्हणून पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अंबाजोगाई नगर परिषदेच्या कारभाराचे भाजपने काढले वाभाडे

## स्वच्छता, पाणी, अतिक्रमण, कर वसुली संदर्भात मुख्याधिकाऱ्यांना बारा मुद्यांचे निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील वाढत्या नागरी समस्या, सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न,आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाच्या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई भाजपच्या शिष्टमंडळाने दि.१७ जून मंगळवार रोजी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी मनिषा टोंगे यांच्याकडे थेट निवेदन सादर करून विविध गंभीर मुद्यांवर माहिती व तत्काळ कारवाईची मागणी केली. शिष्टमंडळात ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, शेख रहीम, दिलीप सांगळे, सारंग पुजारी, संजय गंभीरे, बबलू सिद्दिकी वाजेद खतीब, माजी नगरसेवक, कार्यकर्ते यांचा समावेश होता. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात कचरा उचलणे बंद झाले आहे. रविवार पेठ फिल्टर हाऊसद्वारे मिळणारे पाणी गढूळ व निकृष्ट असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.. पाणी पुरवठा नियोजन योग्य करावे शहरात १०-१२ दिवसांनी पाणी पुरवठा केला जात असून धनेगाव मधील साठा लक्षात घेता ४-५ दिवसाला पाणी द्यावे अशी मागणी केली आहे. औषध



फवारणीची गरज असून मच्छर व आजारांच्या वाढत्या प्रकोपामुळे त्वरित फॉगिंग व औषध फवारणीची मागणी केली आहे नगर परिषदेच्या मालकीच्या जागांवरील अतिक्रमण वाढले असून शहरातील मिनाताई ठाकरे चौक, मुकुंदराज शाळा परिसर,शिवाजी चौक व्यापारी संकुल, राजकमल हॉटेल परिसर इत्यादी ठिकाणांवरील अतिक्रमणांची चौकशी करावी बऱ्याच ठिकाणीअनधिकृत नळ कनेक्शन आहेत त्यात न्यू.व्हिजन इंग्लिश स्कूलसह शहराबाहेर नळ जोडण्या देताना झालेल्या प्रक्रियेची माहिती व कारवाईची मागणी २०१५-२०२४ या कालावधीत नगर परिषदेकडून करण्यात आलेल्या पाणी, बांधकाम, वृक्षारोपण व इतर विभागातील कामांची माहिती तसेच संबंधित देयकांची चौकशी करून पारदर्शकता आणावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

शहरातील मूलभूत नागरी प्रश्नांवर प्रशासनाने वेळकाढूपणा न करता तत्काळ निर्णय घ्यावा अन्यथा भाजपच्या वतीने जनतेसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# केज शहरातील क्रांतीनगर भागातील विविध मागण्या करीता उद्या रास्ता रोको आंदोलन

केज । प्रतिनिधी

केज शहरातील क्रांतीनगर भागामध्ये विविध मागण्या करिता शुक्रवारी २० जून रोजी सकाळी ११ वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याविषयी सविस्तर माहिती अशी आहे की, वरील विषयी १३ जून २०२५ रोजी केज तहसील कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले होते. त्यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे क्रांती नगर झोपड पट्टी ही वस्ती १९८२, १९८३ मध्ये भूमिहीन, बेघर नागरिकांना शासनाच्या वतीने १८६ घरकुले बांधून वाटप केलेले आहेत या भागात अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जाती जमाती, अल्पसंख्याक समाजातील अशिक्षित गोर गरीब नागरिक राहत आहेत. सदर भागात रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजनेमधून काहींना घरकुले मंजूर झालेली आहेत त्या ठिकाणी काही नागरिकांकडे कबालीपत्रक व नगर पंचायतचे पी.टी.आर आहेत. तर दुसरीकडे काही नागरिकांकडे अनेक वर्षा पासून राहत असताना पुरावे नाहीत, पुरावे नसल्याने घरकुल मंजुरी साठी अडचण येत आहे.



शासन निर्णय २०११ च्या नुसार गायरान जमिनीवर निवासी अतिक्रमण कायम करण्याचे आदेश असताना गोरगरीब, अनुसूचित जातीजमाती यांच्या अधिकार क्षेत्रातील न्याय मागन्याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नाही, तरी दि. १९ जून २०२५ पर्यंत आपल्या अधिकारातील काही मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा २० जून रोजी ठीक सकाळी ११:०० वाजता विठ्ठल मंदिर कानडी रोड केज येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी असे या निवेदनाच्या माध्यमातून नमूद करण्यात आलेले आहे.

केज तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात खालील मागण्या करण्यात आलेले आहेत. यश कंन्ट्रक्शन कंपनी ने क्रांती नगर, कानडी रोड लगत नाली व रस्त्याचे आर्धवट सोडलेले काम तात्काळ करण्यात यावे, सिमेंटचे खांबे व गंजलेले लाईटचे पोल, वायर तात्काळ बदलण्यात यावे, क्रांती नगर भागात कायम स्वरूपी पिण्याच्या पाण्याकरिता नवीन पाईप लाईन टाकण्यात यावी, क्रांती नगर केज या भागात मंजुर असलेले स्वस्त धान्य दुकान क्रांती नगर भागात तात्काळ स्थलांतरीत करण्यात यावे, विविध योजनेत मंजूर असलेल्या घरकुलधारक नागरिकांना धनादेश तात्काळ देण्यात यावा, क्रांती नगर येथील विठल मंदिर, महात्मा फुले सभाग्रह, हनुमान मंदिर, डॉ.आंबेडकर सभागृह, जिल्हा परीषद शाळा अंगणवाडी, नियोजित बुध्द विहार जागेची नोंदणी ठराव घेवून नगर पंचायत अभिलेखात करण्यात यावी, गायरान सर्वे-१०० मधील पाझर तलावाशेजारील अनाधिकृत वीटभट्टी तत्काळ बंद करण्यात यावी, आल्पसंख्याक मुस्लीम समाजा करिता स्मशान भूमिसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, इत्यादी मागण्यांसह या निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते माननीय बाबुराव गालफाडे सर, मा.सय्यद शकील, मा. लक्ष्मण जाधव, मा. नागनाथ जावळे, मा.इरफान पठाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्युत महामंडळाचा गलथान कारभार; प्रसंग सावधान राखल्याने माजी सैनिकाचे वाचले प्राण

दौलवडगाव । प्रतिनिधी

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक ठिकाणी विद्युत खांब पडणे किंवा तारा तुटणे असे प्रकार सतत चालू आहेत परंतु आष्टी तालुक्यातील सावरगाव या ठिकाणी शनी मंदिराकडे जाणारी विद्युत पुरवठा करणारी लाईटचे काम दोन ते तीन वर्षांपूर्वी झाले होते परंतु निकृष्ट दर्जाचे झाल्याने या विद्युत पुरवठा चा त्रास सामान्य नागरिकांना सहन करावा लागत असे आहे असाच प्रकार काल घडला. हाय टेन्शन लाईट असणारी विद्युत तार तुटल्याने ती रस्त्यावर पडली व लाईट चालू असताना पार्किंग मध्ये तार तुटली व ती तार नेमकं रस्त्यावरच पडली आणि त्याच रस्त्यावरून माजी



सैनिक घनश्याम मस्के दूध घालण्यासाठी जात होते परंतु त्यांनी प्रसंग सावधान साधत गाडीवरून जंप घेत उडी मारली व आपले जीव वाचवले काळ आला होता पण वेळ आली नव्हती असंच म्हणावं लागेल हे काम करताना ज्या ठेकेदाराने केले त्यांनी निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे इथे लोकांना त्रास सहन करावा लागतोय याच रस्त्यावरून लोकांना मच्छिंद्रनाथ, मायंबा देवस्थानाकडे जावं लागतं तीन वर्षापासून मागणी करूनही विद्युत महामंडळ दखल घेत नाही जर वेळीच दखल घेतली नाही तर तहसील कार्यालयासमोर आम्हाला उपोषणाला बसावं लागेल असा इशाराही माजी सैनिक घनश्याम मस्के यांनी दिला आहे.

# अपघातग्रस्त दोन शेतकरी कुटुंबियांना मिळाला प्रत्येकी २ लाख रुपये विमा

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील अपघातग्रस्त दोन शेतकरी कुटुंबियांना प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत प्रत्येकी २ लाख रुपये विमा लाभ मिळाला आहे, अशी माहिती महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल सावंत यांनी दिली आहे. मधुकर दत्तोबा खाडे, अशोक विठ्ठल शिंदे अशी मयत शेतकऱ्यांची नावे आहेत. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण बँकेमध्ये २० रुपयांचा वार्षिक विमा काढला होता. त्यामुळे त्यांचा अपघाती मृत्यू झाल्यामुळे वारसाला २ लाख रुपये विमा मिळाला आहे. मृत्यू झाल्याची माहिती मिळाल्यानंतर बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल सावंत यांनी त्वरीत क्लेम सादर करून वारंवार पाठपुरावा करून मयत शेकऱ्यांच्या वारसांना २ लाख रुपये मिळवून दिले. श्री.सावंत यांना सहायक शाखा व्यवस्थापक ज्ञानेश्वर बिराजदार, लिपिक पल्लवी गवांडे, सटवा मेंढके यांनी सहकार्य केले. दरम्यान, दोन्ही मयत शेतकऱ्यांच्या वारसांच्या खात्यावर थेट रक्कम जमा झाली आहे.

# चौसाळा ते साञा एस टी बससेवा सुरु

## सचिन आगलावे यांच्या निवेदनाची आगार प्रमुखांनी घेतली दखल

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा ते साञा बससेवा सुरू करण्यात यावी याबाबतीत भारतीय विद्यार्थी सेनेचे मा. बीड जिल्हा सचिव सचिन आगलावे यांनी बीड आगार प्रमुखांना निवेदनाद्वारे ईशारा दिला होता की चौसाळा ते साञा बससेवा तात्काळ सुरु करण्यात यावी अन्यथा बीड आगारा मध्ये विद्यार्थ्यांना सोबत घेवून शाळा भरवण्याचा ईशारा दिला होता या निवेदनाची दखल घेवून बीड आगार प्रमुखानी तात्काळ दि.१९ पासुन चौसाळा ते साञा ही बससेवा सुरू केली असल्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्या चेहऱ्यावरती आनंद दिसुन आला.

या मार्गावर साञा पोञा, देवीबाभळगाव, अंधापुरी, सावरगाव ईत्यादी गावे असुन सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने विद्यार्थी वर्गाचे तसेच वृध्द लोकांचे मोठ्या प्रमाणावर हाल होत होते. याठिकाणी कुठलिही बससेवा नसल्यामुळे येथील नागरिकांना अनेक गोष्टीचा सामना



करावा लागत होता खाजगी वाहनाने प्रवास करणे अवघड होवुन बसले होते. याबाबतीत भारतीय विद्यार्थी सेनेचे माजी बीड जिल्हा सचिव सचिन आगलावे यांनी परिवहन मंत्री व बीड आगार प्रमुखांना निवेदन देवुन बससेवा सुरू न केल्यास बीड आगारा मध्ये शाळा भरवण्याचा ईशारा दिला होता. या निवेदनाची दखल घेवून तात्काळ बससेवा सुरू केल्यामुळे येथील नागरिकांनी बीड आगार प्रमुखासह भारतीय विद्यार्थी सेनेचे माजी बीड जिल्हा सचिव सचिन आगलावे यांचे आभार मानले आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT